संपादक
निलेश पुराणिक

EDITOR
NILESH PURANIK

Email Id- beedlakshyavedh@gmail.com

सा.बीड
# लक्ष्यवेध
अचुक लक्ष्य भेदणारे




८ एप्रिल जागतिक पुस्तक दिन

●वर्ष-३ रे ● अंक १९●मंगळवार दि.७ एप्रिल २०२६●पाने ४●पोस्टल नंबर.- L SB/Beed/RNP-255/2025-2027 ●आरएनआय नं.- MAHMAR/2023/89380 ● मुल्य २ रुपये

● Year-3 ●Paper- 19●Tuesday 7 April 2026 ●Page-4● Postal No. :- L SB/Beed/RNP-255/2025-2027 ● RNI :- MAHMAR/2023/89380 ● Price- 2 Rs.

# बीडमधील बडे हार्टकेअर, मेडिकेअर, वेलनेस आणि माजलगावचे संजीवनी हॉस्पिटलवर डॉ. ओमप्रकाश शेटे यांचा दंडाचा चाबूक

# आयुष्यमान योजनेत डॉक्टरांकडून रुग्णांची लूट



**बीड । प्रतिनिधी**

आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत मोफत व गुणवत्तापूर्ण उपचार देण्याच्या नावाखाली रुग्णांची सर्रास आर्थिक पिळवणूक होत असल्याचा संतापजनक प्रकार बीड जिल्ह्यात उघड झाला आहे. या प्रकरणी कडक भूमिका घेत डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी बीडमधील बडे हार्टकेअर, मेडिकेअर हॉस्पिटल, वेलनेस मल्टीस्पेशालिटी आणि माजलगाव येथील संजीवनी हॉस्पिटलवर एकूण ११ लाख ७८ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावत कारवाईचा चाबूक चालवला आहे. तपासात धक्कादायक बाब समोर आली की, या हॉस्पिटलमधील डॉक्टरांकडून रुग्णांना योजनेअंतर्गत मोफत मिळणाऱ्या उपचारांवरही औषधे, इंजेक्शन आणि इतर सेवांच्या नावाखाली अतिरिक्त पैसे उकळले जात होते. गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांची ही उघड लूट असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामध्ये बडे हार्टकेअरला १० लाख, मेडिकेअरला १ लाख ३० हजार, वेलनेसला १३ हजार ५९६ रुपये आणि माजलगाव येथील संजीवनी हॉस्पिटलला ३६ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

◄◄पान २ वर

## विकासाच्या बैठकीला आडकाठी कोणाची? ‘क्रेडिट’च्या राजकारणावर सवाल

माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथील भगवान पुरुषोत्तम मंदिराच्या विकासासाठी राज्य सरकारकडून मंजूर झालेला निधी हा निश्चितच स्वागतार्ह निर्णय ठरत असताना, त्यापेक्षा जास्त चर्चा रंगत आहे ती जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या महत्त्वाच्या बैठकीभोवती निर्माण झालेल्या वादाची. आयुष्मान भारत समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी या विकासकामासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याचे समोर येत आहे आणि त्याच अनुषंगाने कामाचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती.मात्र, ही बैठक होऊ नये यासाठीच पडद्यामागून काही राजकीय हालचाली झाल्याची चर्चा आता जोर धरत आहे. विशेषतः माजलगाव मतदारसंघातील एका प्रभावशाली नेत्याने या प्रक्रियेत अडथळे निर्माण केल्याची कुजबुज प्रशासनाच्या वर्तुळात ऐकायला मिळत आहे. विकासाचे श्रेय कुणाला मिळावे यावरून सुरू असलेल्या ‘क्रेडिट पॉलिटिक्स’मुळेच हा प्रकार घडल्याचे बोलले जात आहे. याबाबत विचारले असता डॉ. शेटे यांनी संयमित भूमिका घेत कोणाचेही नाव न घेता सर्वांना शुभेच्छा दिल्या. मात्र, त्यांच्या या भूमिकेतून संघर्ष टाळून कामावर लक्ष केंद्रित करण्याचा संदेश स्पष्ट दिसून येतो. आजच्या घडीला महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, देवस्थानाच्या विकासासारख्या पवित्र कामातही राजकारणाचे सावट का यावे? विकासासाठी प्रयत्न करणाऱ्यांच्या पायात अडथळे आणण्यापेक्षा त्यांना सहकार्य करणे अधिक गरजेचे नाही का? डॉ. ओमप्रकाश शेटे विकासासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत, निधी आणण्यासाठी धडपड करत आहेत–अशा वेळी त्यांना रोखण्याऐवजी त्यांना काम करू द्यावे, हीच सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. विकासाला गती देण्याऐवजी अडथळे निर्माण करण्याची प्रवृत्ती थांबणे हीच काळाची गरज असल्याची भावना आता जनतेतून व्यक्त होत आहे.

### डॉ. ओमप्रकाश शेटे माजलगाव मतदारसंघात भविष्यात घराणेशाही व दिग्गजांसाठी मोठे आव्हान

डॉ. ओमप्रकाश शेटे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अगदी जवळचे असून माजलगाव मतदारसंघात त्यांनी आपली पकड मजबूत केली आहे. त्यांनी तीर्थक्षेत्र पुरुषोत्तम पुरीच्या विकासापासून ते जिल्ह्यातील गरजू रुग्णांच्या समस्या, तेलगाव–माजलगाव रस्ता सुधारणे आणि इतर महत्त्वाच्या कामांवर प्रयत्न करून अनेक प्रकल्प मार्गी लावले आहेत. यामुळे मतदारसंघात डॉ. शेटे यांच्या लोकप्रियतेत मोठी वाढ झालेली आहे. स्थानिक कार्यकर्ते आणि नागरिकांकडूनही त्यांचे काम कौतुकास पात्र ठरत असून, भविष्यात घराणेशाही व प्रदेशातील दिग्गज नेत्यांसाठी डॉ. शेटे मोठे आव्हान ठरणार आहे, अशी चर्चा जोर धरत आहे.

# प्रदीप एचपी गॅस एजन्सीने सुरू केली घरपोच डिलिव्हरी




बीड। प्रतिनिधी

प्रदीप एचपी गॅस एजन्सीने आपल्या सर्व ग्राहकांसाठी घरपोच गॅस डिलिव्हरी पुन्हा सुरू केली आहे. काही दिवसांपासून विद्धजन्य परिस्थितीमुळे डिलिव्हरीमध्ये अडथळा आला होता, परंतु आता ग्राहकांना त्यांच्या घरपोच सिलेंडर मिळू लागले आहेत.

ग्राहकांनी ऑनलाइन गॅस बुकिंग करून ओटीपी सुरक्षित ठेवणे, तसेच गॅस कार्डवर योग्य नोंद करणे अनिवार्य आहे. ओटीपी न दिल्यास डिलिव्हरी बॉय सिलेंडर परत घेऊन जाईल आणि ग्राहकांना सिलेंडर मिळणार नाही.

त्याचबरोबर, ई–केवायसी अपूर्ण असलेले किंवा मोबाईल नंबर रजिस्टर न केलेले ग्राहक आपल्या नजीकच्या ऑफिसमध्ये जाऊन ग्राहक क्रमांक व मोबाईल नंबर नोंदवून घ्यावा. फक्त कार्डवर योग्य नोंद व ओटीपी देताना डिलिव्हरी केली जाईल, असे एजन्सीकडून सूचित करण्यात आले आहे.

# तीन वर्षापुर्वी बांधलेला रस्ता आता पाईपसाठी फोडला नागरिकांचा रोष उफाळला



पांगरी रोडवर अशा प्रकारे रस्त्यावरच मातीचे ढिगारे ठेवल्याने नागरिकाचे अपघात होत असून अपघातग्रस्त महिलेची चौकशी करतांना नागरिक दिसत आहेत.

**बीड। प्रतिनिधी**

अगोदरच बीड नगरपरिषद कामात शून्य आहे, हे संपूर्ण ब्रह्मांडालाही माहीत आहे. तरीही, ठराविक कार्यकर्ते आणि नगरसेवकांच्या वार्डातील रस्ते दिसावेत, अशी मागणी त्या भागातील स्थानिक कार्यकर्त्यांची आहे. यासाठी कित्येक वेळा नागरिकांनी आंदोलने, निवेदने आणि नगरपरिषदेच्या खेटा मारल्या; पण त्याचा परिणाम फारसा दिसत नव्हता.

पांगरी रोडच्या बाबतीत परिस्थिती विशेष गंभीर आहे. हा रस्ता तीन वर्षांपूर्वी बांधला गेला, पण त्यापूर्वी नागरिकांना चिखलातून आणि नाल्यांच्या पाण्यातून चालावे लागत असे, अपघाताची भीती कायम होती. त्या काळात नगरपरिषदेने जवळपास सर्व कॉलनी परिसरांना अमृत अटल योजनेअंतर्गत नळ २०१८–१९ दरम्यान दिले, परंतु टाकी बसवली गेली नाही, त्यामुळे २०२३ पर्यंत पाणी सोडले गेले नाही.

सद्यस्थितीत, नगरपरिषदेने या पाईपलाईनसाठी रस्ता पुन्हा फोडला आहे. याचा अर्थ असा की, रस्ता बांधण्यापूर्वी योग्य नियोजन न करता पाईपलाईन बसवली गेली नाही, ही स्पष्ट चूक आहे. आता त्या पाईपलाईनसाठी खोदकाम केले गेले आणि नंतर कच्ची डागडुजी करून चार ते पाच दिवसांपासून रस्ता सिंमेण्टने भरलेला आहे. परिणामी, पांगरी रोडवरून येणाऱ्या नागरिकांना अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे आणि प्रत्यक्षात काही अपघातही झाले आहेत.

◄◄पान २ वर



## अपघाताचा गंभीरपणा आणि फडसे यांचा तत्पर प्रतिसाद

लक्ष्यवेधने बीड नगर परिषदेचे मुख्याधिकारी सीओ फडसे यांना फोन करून माहिती दिली की, पांगरी रोडवर दोन दिवसांत दोन नागरिक अपघातग्रस्त झाले आहेत, तर मंगळवार रोजी बहाद्दरपूर येथील एका महिलेला गंभीर मार लागल्याची घटना घडली आहे. सीओ फडसे यांनी तातडीने कारवाईची खात्री देत सांगितले की, तो रस्ता पुर्ववत करून नागरिकांसाठी सुरक्षित केला जाईल, तसेच भविष्यात अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी तत्पर उपाययोजना केली जातील.

# संपादकीय

## पुरोगामित्वाचा मुखवटा आणि अंधश्रद्धेचे सावट

महाराष्ट्र ही केवळ भौगोलिक सीमा नसून ती संतांची, विचारांची आणि प्रबोधनाची भूमी म्हणून ओळखली जाते. संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम यांसारख्या संतांनी या भूमीला विचारांची दिशा दिली. या परंपरेत विज्ञान, विवेक आणि समाजजागृतीचा वारसा आहे. मात्र आजच्या घडीला हेच महाराष्ट्र राज्य एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आले आहे.

अलीकडेच अशोक खरात आणि एकनाथ शिंदे यांच्यातील कॉल रेकॉर्ड (उऊ्र) लीक प्रकरण समोर आले. या प्रकरणामुळे केवळ राजकीय वर्तुळातच नव्हे तर समाजमनातही अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेषतः या प्रकरणात तथाकथित 'भोंदू बाबा'शी संबंध असल्याच्या चर्चेमुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.मुळात प्रश्न केवळ एका प्रकरणाचा नाही, तर तो विचारसरणीच्या दुटप्पीपणाचा आहे. राजकीय नेते व्यासपीठावर उभे राहून विज्ञाननिष्ठ विचार मांडतात, आधुनिकतेचा पुरस्कार करतात, अंधश्रद्धेविरोधात भूमिका घेतात; मात्र त्याच वेळी स्वतःच अंकशास्त्र, भविष्यकथन आणि भोंदूगिरीच्या जाळ्यात अडकलेले दिसतात. ही केवळ विसंगती नाही, तर जनतेच्या विश्वासाशी केलेली प्रतारणा आहे. रूपाली चाकणकर यांनी एका भाषणात 'सोळा सोमवार' व्रतावर टीका केली होती. कोणत्याही धार्मिक आस्थेचा आदर ठेवणे ही लोकशाहीतील मूलभूत अपेक्षा आहे. आस्था ही वैयक्तिक बाब असते–ती टीकेचा विषय नसून समजून घेण्याचा विषय असायला हवी. मात्र, पुरोगामित्व दाखवण्यासाठी केवळ विशिष्ट धर्मावरच टीका करणे, आणि दुसरीकडे भोंदूगिरीला खतपाणी घालणे, हा दुटप्पीपणा अधिक धोकादायक ठरतो. राजकारणात धर्म आणू नये, ही भूमिका तत्त्वतः योग्य आहे. पण वास्तवात राजकारण हे अनेकदा 'नाट्य' बनते, आणि या नाट्यात धर्माचा वापर केवळ साधन म्हणून केला जातो. कधी मतांसाठी, कधी प्रतिमा उभारण्यासाठी, तर कधी विरोधकांवर टीका करण्यासाठी. यातून समाजात संभ्रम निर्माण होतो–नेमके कोणते विचार खरे आणि कोणते केवळ दिखावा, हा प्रश्न सामान्य माणसाला पडतो. भोंदू बाबांच्या जाळ्यात अडकणारे केवळ सामान्य नागरिक नाहीत, तर सुशिक्षित आणि सत्ताधारी लोकही त्याला अपवाद नाहीत, हे या प्रकरणातून पुन्हा स्पष्ट झाले आहे. ही बाब अधिक चिंताजनक आहे, कारण ज्यांच्याकडून समाजाला दिशा अपेक्षित आहे, तेच जर अंधश्रद्धेच्या प्रभावाखाली येत असतील, तर समाजाने कोणाकडे पाहावे? आज गरज आहे ती केवळ व्यक्तींवर टीका करण्याची नाही, तर संपूर्ण प्रवृत्तीवर प्रश्न उपस्थित करण्याची. राजकीय नेत्यांनी स्वतःच्या आचरणातून विवेकवाद आणि वैज्ञानिक दृष्टिकोन दाखवणे आवश्यक आहे. अन्यथा 'पुरोगामी महाराष्ट्र' ही केवळ घोषवाक्यापुरती मर्यादित राहील. शेवटी, महाराष्ट्राची ओळख ही संतांच्या विचारांनी, समाजसुधारकांच्या कार्याने आणि विवेकाच्या परंपरेने निर्माण झाली आहे. ती ओळख टिकवायची असेल, तर राजकारणातील दुटप्पीपणा आणि अंधश्रद्धेला ठामपणे विरोध करावा लागेल. अन्यथा पुरोगामित्वाचा मुखवटा आणि अंधश्रद्धेचे सावट यामध्ये महाराष्ट्राची खरी ओळख हरवून जाईल.

### जागतिक आरोग्य दिन विशेष

# निरोगी जीवनाचा जागतिक संकल्प आणि बदलत्या काळातील आरोग्याचे व्यापक आव्हान



**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

आरोग्य हीच खरी संपत्ती – ही म्हण केवळ ऐकण्यापुरती नसून मानवी जीवनाचा गाभा आहे. शरीर निरोगी, मन शांत आणि समाज सुदृढ असेल तरच व्यक्ती, कुटुंब आणि राष्ट्र यांची खरी प्रगती साध्य होते. अन्यथा संपत्ती, पद, प्रतिष्ठा आणि यश यांना काहीच अर्थ राहत नाही. म्हणूनच दरवर्षी ७ एप्रिल हा दिवस जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक नसून तो संपूर्ण मानवजातीला आरोग्याविषयी सजग करणारा, जीवनशैलीचा पुनर्विचार करण्यास भाग पाडणारा आणि निरोगी समाज घडवण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. इट इज हेल्थ दॅट इज रिअल वेल्थ अँड नॉट पीसेस ऑफ गोल्ड अँड सिल्व्हर असे महात्मा गांधी यांनी सांगितले होते; आजच्या धावपळीच्या लाइफस्टाइलमध्ये या वाक्याचे महत्त्व अधिकच प्रकर्षाने जाणवते.

पूर्वीच्या काळात जगाला सर्वात मोठा धोका संसर्गजन्य आजारांपासून होता. प्लेग, देवी, कॉलरा, क्षयरोग, मलेरिया यांसारख्या साथींनी लाखो लोकांचे प्राण घेतले. १९१८ च्या फ्लू महामारीने कोट्यवधी लोक मृत्यूमुखी पडले. भारतातही प्लेग आणि कॉलऱ्याच्या साथींनी मोठे नुकसान केले होते. त्या काळात आरोग्य व्यवस्था मर्यादित होती, जागरूकता कमी होती आणि स्वच्छतेच्या सवयी अपुऱ्या होत्या. मात्र विज्ञान, औषधोपचार, लसीकरण आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या विकासामुळे या आजारांवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता आले. देवीसारखा भयंकर आजार पूर्णपणे नष्ट करण्यात मानवजातीला यश आले, ही मोठी उपलब्धी ठरली.परंतु आजची परिस्थिती वेगळी आहे. आज संसर्गजन्य आजारांपेक्षा जीवनशैलीशी संबंधित आजार अधिक धोकादायक ठरत आहेत. जागतिक पातळीवर सुमारे ७० टक्के मृत्यू हे असंसर्गजन्य आजारांमुळे होतात. भारतात सुमारे ७.७ कोटी लोक मधुमेहाने ग्रस्त आहेत, तर २० कोटींपेक्षा जास्त लोक उच्च रक्तदाबाने त्रस्त आहेत. हृदयविकार, कर्करोग, स्थूलता आणि स्ट्रोक यांसारखे आजार झपाट्याने वाढत आहेत. ही आकडेवारी केवळ वैद्यकीय नाही, तर ती आपल्या जीवनशैलीतील बदलांचे स्पष्ट प्रतिबिंब आहे.आजची लाइफस्टाइल ही आरोग्यासाठी सर्वात मोठे आव्हान बनली आहे. पूर्वी श्रमप्रधान जीवन, नैसर्गिक आहार आणि संतुलित दिनचर्या होती. आज बसून काम करण्याचे प्रमाण वाढले आहे, फास्ट फूडचा वापर वाढला आहे, झोपेची वेळ अनियमित झाली आहे आणि स्ट्रेस जीवनाचा भाग बनला आहे. अति तिथे माती ही मराठी म्हण आज अक्षरशः खरी ठरते. शरीराला आवश्यक हालचाल कमी झाली आणि मानसिक ताण वाढला – या असंतुलनामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. मानसिक आरोग्य हा आजच्या काळातील सर्वात महत्त्वाचा विषय बनला आहे. भारतात प्रत्येक ७ पैकी १ व्यक्ती स्ट्रेस, अँझायटी किंवा डिप्रेशनचा सामना करत आहे. मात्र अजूनही मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. संत तुकारामांचे मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण हे वचन आजही तितकेच सत्य आहे. मन निरोगी असेल तरच जीवन संतुलित राहते; परंतु आजच्या डिजिटल आणि स्पर्धात्मक जीवनात ही शांतता हरवत चालली आहे.कोविड महामारीने संपूर्ण जगाला आरोग्याचे खरे महत्त्व पुन्हा दाखवून दिले. लाखो लोक मृत्यूमुखी पडले, आरोग्य व्यवस्था ताणली गेली आणि माणूस असहाय्य झाला. या संकटाने एक गोष्ट स्पष्ट केली – आरोग्य ही केवळ वैयक्तिक बाब नसून ती सामाजिक जबाबदारी आहे.पर्यावरणीय बदलांचाही आरोग्यावर मोठा परिणाम होत आहे. वायूप्रदूषणामुळे दरवर्षी सुमारे ७० लाख लोक मृत्यूमुखी पडतात. स्वच्छ पाण्याच्या अभावामुळे हजारो लोक आजारी पडतात. जशी करणी तशी भरणी या म्हणीप्रमाणे आपण पर्यावरणाकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे परिणाम आरोग्यावर भोगावे लागतात.ग्रामीण भागात अजूनही आरोग्य सुविधांचा अभाव, कुपोषण आणि जागरूकतेची कमतरता आहे. भारतातील सुमारे ३५ टक्के मुले कुपोषित आहेत. महिलांच्या आरोग्याबाबतही अनेक समस्या आहेत. त्यामुळे आरोग्य सेवा तळागाळापर्यंत पोहोचवणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाच्या योजना, आरोग्य कॅम्प, लसीकरण मोहिमा आणि स्थानिक प्रशासनाचे प्रयत्न यामुळे परिस्थितीत सुधारणा होत आहे. आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका आणि आरोग्य कर्मचारी यांच्या माध्यमातून गावागावात जनजागृती केली जाते.आरोग्य टिकवण्यासाठी काही मूलभूत गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत – संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि मानसिक शांतता. अर्ली टू बेड अँड अर्ली टू राईज मेक्स अ मॅन हेल्दी, वेल्दी अँड वाईज ही म्हण आजही तितकीच लागू पडते. योग, प्राणायाम आणि आयुर्वेद या आपल्या परंपरेतील पद्धती आरोग्य टिकवण्यासाठी उपयुक्त आहेत. आजचा माणूस पैसा आणि यशाच्या मागे धावत आहे, पण आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहे. परिणामी पुढील आयुष्यात गंभीर आजारांना सामोरे जावे लागते. त्यामुळे पहिले आरोग्य, मग सर्व काही ही जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. समाजाच्या प्रगतीसाठी निरोगी नागरिक आवश्यक असतात. आरोग्य चांगले असेल तर कार्यक्षमता वाढते आणि देशाची प्रगती वेगाने होते.शेवटी एवढेच – निरोगी शरीर, शांत मन आणि सजग समाज यांचा संगम साधला तरच खऱ्या अर्थाने सशक्त राष्ट्र उभे राहू शकते. सजग नागरिक – निरोगी समाज – सशक्त राष्ट्र हा संदेश मनात ठेवून प्रत्येकाने आपल्या जीवनात आरोग्याला सर्वोच्च स्थान दिले पाहिजे.

पान १ वरुन

## बीडमधील बडे हार्टकेअर,

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत जिल्ह्यात तब्बल ७३ तक्रारी दाखल झाल्या होत्या. यापैकी बहुतेक तक्रारींची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान तसेच अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली.

पत्रकार परिषदेत बोलताना डॉ. शेटे यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, आयुष्यमान योजनेच्या नावाखाली रुग्णांची लूट करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. अतिरिक्त वसुली, बनावट उपचार किंवा नियमभंग आढळल्यास थेट फौजदारी गुन्हे दाखल केले जातील. दंडातून जमा होणारी रक्कम कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या उपचारासाठी वापरण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून ही केवळ काही हॉस्पिटल्सची बाब नसून संपूर्ण व्यवस्थेतच गोंधळ आणि लूट सुरू आहे अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे. दीप हॉस्पिटलच्या चौकशीत परवानगीविना रुग्णालय सुरू असल्याचेही उघड झाले असून प्रशासनाच्या देखरेखीवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

यामुळे आता जिल्ह्यातील सर्वच रुग्णालयांची अचानक तपासणी करून फीसचे दरपत्रक, उपचारांची गरज, औषधांचे दर आणि बिलिंग पद्धती यांची कठोर पडताळणी करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. रुग्णांना तक्रार नोंदवण्यासाठी टोल फ्री क्रमांक ८००२३३२२०० उपलब्ध करून देण्यात आला असून गैरप्रकारांविरोधात पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## तीन वर्षापुर्वी

स्थानिक नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. अर्धवट कामामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. अपघात होऊ नये म्हणून प्रशासनाने त्वरित उपाययोजना करावी, असे नागरिकांनी तक्रार केली.

बीड नगरपरिषदेच्या ढिसाळ कामगिरीवर नागरिकांनी मिश्कील प्रतिक्रिया दिली आहे. काही दिवसांपूर्वी वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी ६० लाख खर्च करून ट्राफिक सिग्नल बसवले गेले होते; मात्र तेही पक्के बसवलेले नाहीत. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, नगरपालिकेची कामगिरी इतकी कौतुकास्पद आहे की, नगरपालिकेला जागतिक पातळीवरील नोबेलसारखा पुरस्कार मिळायला हवा.

# शौर्य आणि धैर्याचे प्रतिक धर्मरक्षक राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर



**डॉ.स्नेहा सोनकाटे**

रणझुंजार रणधुरंधर शौर्य आणि धैर्याच प्रतिक अंखड भारत देशावर चार दशाकाहून अधिक काळ स्त्री शासक म्हणून राज्य करत असताना आपल्या नेतृत्वाचा आणि कर्तृत्ववाचा ठसा उमटवत हिंदू धर्माच रक्षण आणि संरक्षण करत साम्राज्य विस्तार करत इतिहास रचला त्या स्त्री शासक अहिल्यादेवी होळकर त्यांच्या कार्य कर्तृत्वाने त्यांचा स्त्री शासक म्हणून वैश्विक पातळीवर गौरव निर्माण झाला शासक म्हणून त्यांनी अंमलात आणलेल्या अनेक योजना आजही विद्यमान सरकार राबवत आहेत म्हणजे किती मोठी त्यांची दुरदृष्टी असेल याची साधी सरळ कल्पना देखील आपण करू शकत नाहीत.मात्र दुर्दैवाने इतिहासाला हे अनमोल योगदान मौल्यवान वाटलं नाही हे दुर्दैव नेमक कुणाचं इतिहासाचं कि आपलं हे येणारा काळ ठरवेल मात्र किर्ती हि फार काळ लपून राहत नाही हिरा कुठेही पडु द्या तो हिराच असतो वाघ झोपला तरी तो जंगलाचा राजाचं असतो.भारत हा बहू धार्मिक आणि बहू भाषिक देश आहे या देशावर अनादी काळापासून अनेक परकीय आक्रमण झाली परकिय राज सत्ता आल्या मात्र तरी देखील या देशात बहुसंख्य हिंदूच आहेत या देशात देखील राष्ट्र रक्षणासाठी वेगवेगळ्या कालखंडामध्ये वेगवेगळे महापुरुष संत महंत योगी जन होऊन गेले ज्यांनी धर्म रक्षण केले योगदान सगळ्यांच आहे मात्र इतिहास हा वशिलेबाजी ने चालतो कारण अहिल्या देवी होळकर यांनी इंदौर सारख्या सपाट मैदानी प्रदेशात तळ ठोकून चार दशके या देशात राज्य केले एक स्त्री जर मैदानी प्रदेशात खंबीरपणे उभा राहून राज्य करत असेल तर मग त्यांचं शौर्य आणि धैर्य किती मोठं असेल आणि हे शौर्य आणि धैर्य कदाचित इतिहासाला पेललं नसेल म्हणून हा पराक्रम वंचित ठेवलं असेल प्रत्येक कालखंडामध्ये कोणीतरी महापुरुष अथवा संत यांनी धर्म रक्षण केले हा वास्तव इतिहास आहे म्हणून या देशात धर्म रक्षणार्थ अनेकांचं योगदान आहे त्या त्या काळात त्या त्या महापुरुषांचा साधू संताच योगी जनांच अनमोल असं योगदान आहेच तेराव्या शतकात संत ज्ञानेश्वर माऊली पंधराव्या सोळाव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराज सतराव्या शतकात पेशवे अठराव्या शतकात अहिल्यादेवी होळकर एकोणिसाव्या शतकात जगद्विख्यात तत्वज्ञानी थोर प्रबोधनकार युगप्रवर्तक राष्ट्र संत भगवानबाबा यांनी देखील भागवत धर्माला गतवैभव प्राप्त करून दिलं मात्र इतिहास लिहिणारी जी काही मंडळी आहे त्यांनी त्याच्या विवेका नुसार योगदान नोंदवलं आणि काही नोंदी जाणीवपूर्वक दुर्लक्षीत केल्या हे वास्तव आहे मात्र जे दुर्लक्षित केले ते या काळातील तरूणांनी शोधलं पाहिजे.जो बडबड करतो त्याचे हुलगे विकतात आणि जो मौन धारण करतो त्याच सत्य असूनही कोणी लक्ष्य देत नाही हे या युगाचं विचित्र लक्षणं आहे या देशाच्या इतिहासात अनेकांच योगदान आहे मात्र या योगदानाला संख्येची झालर आहे म्हणूनच संख्या पाहून योगदान लिहलं जात मात्र कर्तृत्व हे कोणालाही पुसता येत नाही धर्माचं रक्षण आणि संरक्षणाच कार्य इतिहासाला पेलणार नाही एवढं मोठं कार्य करणाऱ्या या देशातील पहिल्या स्त्री शासक अहिल्यादेवी होळकर होत्या हे कटु सत्य आहे आणि त्या देखील अगदी सपाट मैदानी प्रदेशात खंबीरपणे उभा राहून राज्य करत वैश्विक पातळीवर किर्ती स्थापित करणार्या पहिल्या महिला आहेत या देशात अगदी आनदी काळापासून परकिय आक्रमण होतं आली आहेत आक्रमण करणारे जवळपास सगळेच परकिय राजे हे मुस्लिम होते तरी देखील धर्म टिकून होता हे देखील विशेष आहे ज्या त्या कालखंडामध्ये जे काही महापुरुष योगी संत असतात त्या महापुरुषांचं बऱ्यापैकी धर्म रक्षणार्थ योगदान असतंच इतिहासकार अनेकदा खरया नोंदी घेत नाहीत हे दुर्दैव आहे इतिहासात कोणाला स्थान द्यायचं हे बुद्धिजीवी लोक ठरवतात मात्र वारणासी ते मल्लिकार्जुन आणि सोमनाथ ते जगन्नाथ पुरी हि सगळी देवस्थान यांचा जीर्णोद्धार करणार्या अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने त्या ठिकाणी असणारे शिलालेख कसे पुसणार त्याच्या नावाचे शिलालेख आजही त्या ठिकाणी उपलब्ध आहे तो इतिहास आणि इतिसकार कसा पुसू शकतील आपला इतिहास आहे आपणच मांडला पाहिजे आपलं शौर्य आणि धैर्य हे आपल्या वारसांना देखील कळल पाहिजे कारण प्रेरणा हि खूप महत्वपूर्ण असते जुन्या प्रेरणेतून नवा इतिहास निर्माण होतो म्हणून लिखाणातील इतिहास नाही तर खरा इतिहास आपला आपल्याला महित असलाच पाहिजे अहिल्यादेवी होळकर या शौर्य आणि धैर्याच्या महामेरू होत्या हिमालयाच्या उत्तुंग उंचीचे नेतृत्व या देशाला देणारा क्षत्रिय कुळातील धनगर समाज कणभर देखील कुठेही मागे नाही आणि भविष्यात देखील मागे पडू नये म्हणून शिक संघटित व्हा आणि उन्नतीचा मार्ग धरा

# महात्मा ज्योतिबा फुले-डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सणाच्या निमित्तानेसर्व शिक्षकांचे वेतन 10 एप्रिल पर्यंत खात्यात जमा करा-विनाअनुदानित शाळा कृती समितीची मागणी



**बीड । प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सणाच्या निमित्ताने बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्च -२०२६ चे वेतन १० एप्रिल पर्यंत त्यांच्या खात्यात जमा करावे अशी मागणी 'बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समिती'च्या वतीने बीड शिक्षणाधिकारी पाटील मॅडम यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली.

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सण तोंडावर आलेला असताना बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचे वेतन त्यांच्या खात्यात अद्याप जमा झालेले नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शिक्षकांना फुले आंबेडकर जयंती सण कसा साजरा करावा याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ऐन सणासुदीच्या काळात ही समस्या अधिक गंभीर ठरत आहे. या जयंती सणाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने सहानुभूतीपूर्वक विचार करून जिल्ह्यातील शिक्षकांचे मार्च -२०२६ चे वेतन जयंतीपूर्वी, म्हणजेच १० एप्रिलपर्यंत त्यांच्या बँक खात्यात जमा करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे केली. यावेळी शिक्षणाधिकारी श्रीमती पाटील मॅडम यांनी विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी बोलताना त्यांनी संच मान्यता आणि शिक्षक समायोजनाचा प्रश्न मार्गी लागण्याची प्रकिया सुरू आहे. सदरील प्रक्रिया १० एप्रिल पर्यंत पूर्ण होईल. ही प्रक्रिया पूर्ण होताच सर्व शिक्षकांच्या खात्यावर वेतन जमा करणार असल्याचे सांगितले. या निवेदनावर जितेंद्र डोंगरे, आत्माराम वाव्हळ, तुकाराम खाडे, प्रा. सोनवणे, अशोक मोरे, सुभाष मोरे, अभिमन्यू बोरखेडे, शिवप्रसाद सिरसाट, प्रा. ढास आणि प्रा. मस्के आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## २०३५ पर्यंत एसटी ताफा पूर्णपणे इलेक्ट्रिक करणार ना.सरनाईक यांची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, 'महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५' अंतर्गत २०३५ पर्यंत राज्य परिवहन (एसटी) महामंडळाचा संपूर्ण बस ताफा इलेक्ट्रिक करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय शासनाने घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत दिली.नियम २६० अंतर्गत मांडलेल्या प्रस्तावावर बोलताना मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, वाढते वायूप्रदूषण, इंधन दरातील चढ-उतार आणि जागतिक हवामान बदल यांचा विचार करता इलेक्ट्रिक वाहनांचा वापर ही काळाची गरज ठरली आहे. सुमारे १४ हजार बसचा ताफा असलेली एसटी ही ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी असून, या सेवेचे रूपांतर हरित ऊर्जेवर करण्याचा शासनाचा विचार आहे. या धोरणाअंतर्गत नागरिकांना इलेक्ट्रिक वाहन खरेदीसाठी कर सवलती देण्यात येणार असून, टोल माफीमुळे प्रवास खर्चात बचत होणार आहे. तसेच राज्य व राष्ट्रीय महामार्गांवर दर २५ किलोमीटर अंतरावर चार्जिंग सुविधा उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. चार्जिंग पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन देण्यात येणार असून, संशोधन, नवकल्पना आणि कौशल्य विकासाला चालना दिली जाणार आहे.

## तुलसी महाविद्यालयात भारतीय ज्ञान प्रणाली आणि संशोधन विषयावर ऑनलाईन चर्चासत्र

**बीड ।प्रतिनिधी**

**देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे आयोजित एक दिवसीय ऑनलाईन चर्चासत्र शनिवारी उत्साहात संपन्न झाले. 'भारतीय ज्ञान प्रणाली, बौद्धिक संपदा अधिकार आणि संशोधन पद्धती' या विषयांवर हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. योगिता लांडगे यांनी प्रास्ताविकातून चर्चासत्राच्या आयोजनामागील उद्दिष्ट स्पष्ट केले. यानंतर डॉ. विकास वाघमारे यांनी मान्यवर वक्ते व सहभागींचे मनःपूर्वक स्वागत केले.**




चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात मुंबई येथील अमिटी युनिव्हर्सिटीचे डॉ. बाबासाहेब जोगदंड यांनी 'डिजिटल युगातील भारतीय ज्ञान प्रणाली' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी सांस्कृतिक पर्यटन व वारसा शिक्षणामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून परिवर्तन कसे घडवता येते, याबाबत सविस्तर विवेचन केले.

दुसऱ्या सत्रात छत्तीसगड येथील श्री शंकराचार्य प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे डॉ. संतोष कुमार यांनी 'संशोधन पद्धती आणि गुणात्मक डेटा विश्लेषण' या विषयावर मार्गदर्शन करत संशोधनासाठी उपयुक्त आधुनिक साधनांची माहिती दिली.तिसऱ्या व अंतिम सत्रात आयआयआयटी वडोदरा आंतरराष्ट्रीय दीव कॅम्पसचे डॉ. विकास कुमार यांनी 'बौद्धिक संपदा अधिकार ' या विषयावर भाष्य करत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीसाठी आयपीआरचे महत्त्व अधोरेखित केले.

हे चर्चासत्र यशस्वी पार पाडण्यासाठी प्राचार्य डी जी निकाळजे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी तसेच आयक्यूएसी विभागाच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. या ऑनलाईन उपक्रमाला विद्यार्थी व संशोधकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## ज्येष्ठ पत्रकार महेश वाघमारे, डॉ. गणेश ढवळे,नरेंद्र कदम सन्मानित

### मावलाई श्री राज्यस्तरीय पुरस्कारांचे थाटात वितरण




**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील बऱ्हाणपूर येथील मावलाई युवक क्रीडा मंडळ आणि व्यायामशाळेच्या वतीने शुक्रवारी मावलाई राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. पत्रकारितेतून जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे, सामाजिक क्षेत्रातून डॉ.गणेश ढवळे व क्रीडा क्षेत्रातून ठाण्याचे नरेंद्र कदम यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून सन्मानीत करण्यात आले. शाल श्रीफळ स्मृतिचिन्ह व रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

मावलाई युवक क्रीडा मंडळाच्या वतीने शुक्रवारी (दि.३) गेवराई तालुक्यातील बऱ्हाणपूर येथील मावलाई देवीच्या यात्रेनिमित्त कै.बाबासाहेब वराट सार्वजनीक वाचनालयात आयोजीत कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतीनिष्ठ शेतकरी कल्याण कुलकर्णी तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी,पत्रकार अतुल कुलकर्णी, अविनाश वाघिरकर,दिनेश लिंबेकर, सुशील देशमुख, विकास उमापूरकर, क्रीडा मंडळाचे सचिव भागवत वराट आदी उपस्थीत होते.

**पुरस्कार्थींनी व्यक्त केल्या भावना**

पुरस्कार प्राप्त नरेंद्र कदम म्हणाले की, ग्रामीण भागातील एखादी संस्था विविध क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या व्यक्तींची पुरस्कारासाठी निवड करून त्यांना सन्मानित करते हे प्रेरणादायी आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर गणेश ढवळे म्हणाले सामाजिक क्षेत्रात काम करत असताना वंचित उपेक्षित घटकांना न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरून वेळप्रसंगी शासन प्रशासनाला वास्तव सांगून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही करतो या पुरस्काराने हे कार्य पुढे नेण्यासाठी बळ मिळाले आहे. तर ज्येष्ठ पत्रकार महेश वाघमारे म्हणाले बीड जिल्ह्याला पत्रकारितेचा समृद्ध वारसा लाभलेला आहे या ठिकाणची पत्रकारिता अतिशय परिपक्व आणि विषयानुरूप गांभीर्यपूर्वक लिखाण करून अन्याय अत्याचाराला वाचा फोडणारी आहे मागील काही वर्षात अध्यात्म आणि सांस्कृतिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल या पुरस्काराने सन्मानित केल्याने अध्यात्म क्षेत्रात लिखाणासाठी आणखी उत्साह वाढला असल्याचे सांगत त्यांनी भागवत वरात यांच्या वराट यांच्या कार्याचे कौतुक केले. सूत्रसंचालन पत्रकार प्रमोद कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास धनंजय बजगुडे, गणेश शेंडगे, कुमार देशमुख संतोष कदम युनूस शेख यांच्यासह बऱ्हाणपूर येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

**पुढील वर्षापासून शेतीनिष्ठ शेतकऱ्यांना पुरस्कार**

क्रीडा मंडळाचे सचिव भागवत वराट प्रास्तविकात बोलतांना मागील १९ वर्षांपासून मावलाई देवी यात्रेनिमित्त बऱ्हाणपूर येथे अध्यात्म, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रात अविरत योगदान देणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आगामी काळातही या पुरस्कारांची परंपरा कायम ठेवली जाणार असून पुढील वर्षीपासून कृषी क्षेत्रात अमूल्य योगदान देणाऱ्या शेतकऱ्यालाही या पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याचे वराट यांनी सांगीतले.

## जिल्हयासाठी ३ स्थानिक सुट्टया जाहिर

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी बीड यांच्या अधिकारात असणा-या वर्षातील ३ स्थानिक सुट्टयांबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार चालु वर्षात ३१ ऑगस्ट २०२६ सोमवार रोजी तिस-या श्रावणी सोमवारी पहिली स्थानिक सुट्टी असणार आहे.ज्येष्ठगौरी पूजन शुक्रवार दि. १८ सप्टेंबर २०२६ रोजी दुसरी स्थानिक सुटी असेल. त्यानंतर ६ नोव्हेंबर २०२६ रोजी धनत्रयोदशी निमित्ताने जिल्हयासाठी तिसरी स्थानिक सुटी असेल.

या तीन सुटया जिल्हयातील सर्व राज्य शासकीय कार्यालये, जिल्हा परिषद अंतर्गत कार्यालये, नगर परिषद कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालये, कोषागार आणि उपकोषागार कार्यालये तसेच इतर शैक्षणिक संस्थांसाठी आहेत.जिल्हयातील दिवाणी व फौजदारी न्यायालये तसेच केंद्र शासनाची कार्यालये आणि बँका यांना ही सुटी लागू राहणार नाही.

## गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या परीक्षांमध्ये उत्कृष्ट यश संपादन करत महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.




या परीक्षेत महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी उच्च गुण मिळवत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला. काही विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. या परीक्षेत महाविद्यालयाचा अंतिम वर्षाचा निकाल १००%, तृतीय वर्षाचा निकालही १००%, आणि द्वितीय वर्षाचा निकाल ९०% लागला आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रम, नियमित अभ्यास आणि प्राध्यापकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाले असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

गुणवंत विद्यार्थ्यांची यादी पुढीलप्रमाणे बीपीटी अंतिम वर्ष ( १००% निकाल ) प्रथम क्रमांक श्रावस्ती जगताप = ६२%, द्वितीय क्रमांक शामल चव्हाण = ६१.५%, तृतीय क्रमांक मनीषा होके = ५७.८७%, बीपीटी तृतीय वर्ष ( १००% निकाल ),प्रथम क्रमांक अलिशा काटे = ६६%,द्वितीय क्रमांक श्रुती उन्हाळे = ६५.२%, तृतीय क्रमांक मानसी जोंधळे = ६४.८%, बीपीटी द्वितीय वर्ष ( ९०% निकाल), प्रथम क्रमांक यशराज पाटील = ६०%, द्वितीय क्रमांक अमन शेख = ५९.८५%, तृतीय क्रमांक राहुल पवार = ५९.४२% महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच, भविष्यातही असेच यश संपादन करून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपी हे गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे अग्रगण्य संस्थान म्हणून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# नगर रोडवरील दुभाजक खुला करण्यासाठी आ.क्षीरसागर यांनी घेतली अभियंता भोपळे यांची भेट

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील वाढती वाहतूक कोंडी, नागरिकांची गैरसोय आणि अपघातांची शक्यता लक्षात घेता नगर रोडवरील जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील रस्ता दुभाजक (डिव्हायडर) खुला करण्याची मागणी जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभियंता राजेंद्र भोपळे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.**



या बैठकीदरम्यान संबंधित ठिकाणी नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्यात आला. विशेषतः, वाहनचालकांना मोठा वळसा घ्यावा लागत असल्याने वेळेचा अपव्यय, इंधन खर्च वाढ आणि वाहतूक कोंडी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच, आपत्कालीन सेवांच्या वाहनांना होणारा उशीर आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्नही अधोरेखित करण्यात आला.

आ. संदीप क्षीरसागर यांनी नागरिकांच्या सोयीसाठी हा दुभाजक तातडीने खुला करण्याची मागणी करत, वाहतूक सुलभ व सुरक्षित करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे सुचविले. यामध्ये योग्य ठिकाणी यू-टर्नची व्यवस्था, सिग्नल प्रणाली किंवा पर्यायी वाहतूक नियोजनाचा विचार करण्याबाबतही चर्चा झाली.

अभियंता राजेंद्र भोपळे यांनी या मागणीची दखल घेत संबंधित प्रस्तावावर सकारात्मक विचार करून लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, स्थानिक नागरिकांनीही या निर्णयाची अपेक्षा व्यक्त करत प्रशासनाने लवकरात लवकर ठोस पावले उचलावीत, अशी मागणी केली आहे.

# अवकाळीने झालेल्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना आर्थिक मदत

## जानेवारीपासून झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्याची कार्यवाही सुरू

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात ऑक्टोंबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी १ लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांना १२८ कोटी ६५ लाख रुपयांची मदत देण्यात आल्याची माहिती मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.



ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाने राज्यात शेतीचे सुमारे १ लाख १४ हजार ७५२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. यामुळे १ लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांच्या शेती आणि शेतीमालाचे नुकसान झाले. या नुकसान भरपाईपोटी शेतकऱ्यांना १२८.८६ कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. हे नुकसान प्रामुख्याने चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, जळगाव, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात झाले होते. जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे एकूण १,४५,६०६ हेक्टरखालील शेतीचे नुकसान झाले असून २,३३,८९० शेतकऱ्यांना फटका बसला आहे. या पावसामुळे केळी, कांदा, पपई, आंबा, द्राक्षे, गहू, हरभरा, ज्वारी इत्यादी पिकांचे नुकसान झाले आहे. प्रामुख्याने लातूर, सोलापूर, नाशिक, सातारा, धुळे, नंदूरबार, यवतमाळ, अहिल्यानगर, पुणे, जालना, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या अवकाळी पावसामुळे पाच लोकांचा मृत्यु आणि नऊ लोक जखमी झाले. अवकाळी पावसामुळे ३६ जनावरांचाही मृत्यु झाला आहे.

# पडलेल्या सिग्नलचा 'करंट' प्रशासनाला कधी बसणार? - विद्युत विभागावर कारवाईची नगरसेविका आरती बनसोडे यांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नगर रोडवर पडलेला सिग्नल नागरिकांसाठी जीवघेणा ठरण्याची शक्यता निर्माण झाली होती. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी या गंभीर प्रकारामुळे प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. संबंधित गुत्तेदारावर कारवाई करण्यात आली असली, तरी या कामाच्या देखरेखीची जबाबदारी असलेल्या नगर परिषद विद्युत विभागाचे विभागप्रमुख उदय इपिली यांच्या हलगर्जीपणावरही बोट ठेवले जात आहे.

स्थायी समितीच्या बैठकीत सभापती आरती बनसोडे यांनी हा मुद्दा आक्रमकपणे मांडत, फक्त गुत्तेदारावर कारवाई करून चालणार नाही,



जबाबदार अधिकाऱ्यांवरही तात्काळ कारवाई झाली पाहिजे, अशी ठाम भूमिका घेतली. यासंदर्भात त्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे सविस्तर मागणीही केली आहे.दरम्यान, त्यांनी धानोरा रोडवरील अपूर्ण रस्ता व नाली काम, पालवण चौक परिसरातील स्वच्छतेचा अभाव, तसेच १५ व्या वित्त आयोगाच्या निधीचा वापर केवळ स्वच्छता आणि पाणीपुरवठ्यावरच करावा, अशा विविध महत्त्वाच्या मागण्या देखील मांडल्या.

या सर्व घडामोडींमुळे बीड नगर परिषद प्रशासन पुन्हा एकदा नागरिकांच्या रोषाच्या केंद्रस्थानी आले असून, आता प्रत्यक्षात कारवाई कधी होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रक्तदानाने गरजुवंत रूग्णांचे प्राण वाचविण्याचे काम केले: डॉ.गंडाळ



**बीड । प्रतिनिधी**

रक्ताचा तुटवडा पाहता,शेकडो रक्तदात्यांनी रक्तदान करुन गरजुवंत रूग्णांचे प्राण वाचविण्याचे काम केले आहे. असे समाज उपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जावेत, असल्याचे प्रतिपादन डीएचओ डॉ.उल्हास गंडाळ यांनी व्यक्त केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने सोमवार (दि.६) एप्रिल रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. हा रक्तदान शिबीराचा कार्यक्रम बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी डीएचओ डॉ.उल्हास गंडाळ बोलत होते. यावेळी जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. सचिन शेकडे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी शेख रौफ आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ.उल्हास गंडाळ म्हणले की,रक्तदान हे श्रेष्ठदान आहे. रक्तदानामुळे अनेक गरजुवंत रूग्णांचे प्राण वेळोवेळी वाचवले जावू शकतात. दिवसेंदिवस रक्तदानाचा तुटवडा जाणवत आहे. त्या अनुषंगाणे गेल्या अनेक वर्षापासून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून प्रत्येक वर्षी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगाने सोमवारी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबीरामध्ये शेकडो रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले.

या रक्तदानाच्या शिबीरासाठी जिल्हा रूग्णालयातील डॉ.अंकिता पाटील, डॉ.ऊर्जा पाटील, पल्लवी बनसोडे, ब्रदर्स संतोष गायकवाड, टेक्निशियन सचिन सत्कर, दादा कुमकर, दिनकर सुपेकर, यांनी रक्तदानाची वैद्यकिय जबाबदारी पार पाडली.हा रक्तदान शिबीराचा कार्यक्रम यशस्विरित्या पार पाडण्याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती तसेच रक्तदान शिबीर समिती यांच्यासह आदी कार्यकर्त्यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

# मनोज शिंदे यांची चव्हाण यांच्या कार्यालयास भेट

**बीड । प्रतिनिधी**

मनोज शिंदे यांनी युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या जनसंपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. त्यांच्या आगमनावेळी कार्यकर्त्यांनी उत्साहात स्वागत केले. भेटीदरम्यान संघटनात्मक बळकटी, आगामी उपक्रम आणि पक्षविस्तार यावर चर्चा करण्यात आली.

शिवसेना मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन, शिवसेना जिल्हाप्रमुख बीड सचिन मुळक, शिवसेना जिल्हाप्रमुख बीड चंद्रकांत नवले, युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख आष्टी सुमित कोळपे, युवासेना लोकसभा अध्यक्ष पाटोदा प्रतीक भोसले, युवासेना उपजिल्हा प्रमुख केज विधानसभा काशिनाथ जाधव, युवासेना उपजिल्हा प्रमुख गेवराई विधानसभा निलेश पवार, युवासेना उपजिल्हा प्रमुख आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा गणेश मकाळ, युवासेना लोकसभा प्रमुख आष्टी शिवराज उगले, तसेच वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हाप्रमुख महादेव मातकर उपस्थित होते.

# दीनदयाळ नागरी सहकारी बँकेस २.०५ कोटींचा नक्त नफा; १००० कोटी व्यवसायाच्या दिशेने वाटचाल



अॅड.मकरंद पत्की (अध्यक्ष) अॅड.राजेश्वर देशमुख (उपाध्यक्ष)

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

विश्वास, विकास आणि विनम्रता या त्रिसूत्रीवर कार्यरत असलेल्या दीनदयाळ नागरी सहकारी बँकेने ३१ मार्च २०२६ अखेर २ कोटी ०५ लाख रुपयांचा नक्त नफा मिळवला आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये बँकेच्या ठेवी ६०९.८३ कोटी, कर्जवाटप ३४६.६५ कोटी तर एकूण व्यवसाय ९५६ कोटींवर पोहोचला असून नेट एनपीए केवळ ०.६४ टक्के इतका कमी आहे. लवकरच बँक १००० कोटींचा व्यवसाय टप्पा पार करणार असल्याची माहिती अध्यक्ष अॅड. मकरंद पत्की व उपाध्यक्ष अॅड. राजेश्वर देशमुख यांनी दिली.

मराठवाड्यात १८ शाखांद्वारे कार्यरत असलेल्या बँकेचे मुख्यालय अंबाजोगाई येथे असून सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवले जातात. बँकेच्या प्रगतीत कॅबिनेट मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच संचालक राजाराम धाट, सौ. शरयूताई हेबाळकर, विजयकुमार कोपले, चैनसुख जाजु, इंजि. बिपीन क्षीरसागर, प्राचार्य किसन पवार, मकरंद कुलकर्णी, बाळासाहेब देशपांडे, डॉ. विवेक दंडे, प्रा. अशोक लोमटे, जयकरण सुरेशकांबळे, तज्ज्ञ संचालक भिमा ताम्हाणे, अॅड. अशोक कुलकर्णी यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी महेश उत्तमराव शेळके यांनी सांगितले की, आर्थिक चढ-उतार व अडचणींच्या काळातही संचालक मंडळाचे मार्गदर्शन, कर्मचारीवर्गाचे टीमवर्क आणि ग्राहकांचा विश्वास यामुळे बँकेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अधिकारी, कर्मचारी, सभासद, ठेवीदार व ग्राहक यांच्या सहकार्यामुळेच हा यशाचा टप्पा गाठता आला असल्याचे त्यांनी नमूद केले. आगामी आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्येही अधिक प्रगती साधण्याचा विश्वास बँकेकडून व्यक्त करण्यात आला.

**हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक निलेश चंद्रकांतराव पुराणिक यांनी सचिन ऑफसेट, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड ४३११२२ येथे छापून साप्ताहिक बीड लक्ष्यवेध कार्यालय, माऊली वास्तुशिल्प अपार्टमेंट, विश्वास नगर, पांगरी रोड, बीड (महाराष्ट्र)येथे प्रकाशित केले आहे. संपादक : निलेश चंद्रकांतराव पुराणिक (मो.९६६५५५८३६९) या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद-विवाद बीड न्यायालयांतर्गत)**

This Newspaper is Owner, Printer, Publisher, Editor Nilesh Chandrakantrao Puranik, Printed at Sachin Offset Printers, Subhash Road, Beed Tq & Dist Beed 431 122 and Published At weekly Beed Lakshyavedh Office Mauli Vastushilp Apartment, Vishwas Nagar, Pangari Road Beed (Maharashtra).431 122.